● शुक्रवार, दि. १० जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १६३ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827

## मनपा टॅक्स वाढीला आ खोतकर जबाबदार

माजी आ. गोरंट्याल यांचा आरोप



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील मालमत्ता धारकांना वाढीव टॅक्स लागू करण्यासाठी आ.अर्जुन खोतकर हेच जबाबदार असल्याचा आरोप काँग्रेसचे माजी आ. कैलास गोरंट्याल यांनी पत्रकारांशी बोलतांना केला आहे.

जालना नगर पालिकेचे महानगर पालिकेत रूपांतर करण्यासाठी आपण सातत्याने विरोध करत आलो आहोत. महापालिका अस्तित्वात आल्यास शहरातील जनतेवर वाढीव टॅक्सचा बोजा पडणार असल्याचे आपण वारंवार सांगितले होते. मात्र, काही मंडळींनी आर्थिक बाबींचा आणि जनतेवर लादण्यात येणाऱ्या वाढीव कराचा कोणताही विचार न करता राज्यात असलेल्या सत्तेच्या माध्यमातून जालना नगर पालिकेचे महानगर पालिकेत रूपांतर करण्याचा आपला बालहट्ट पूर्ण केला असल्याची टीका गोरंटयाल यांनी केली आहे. महत्वाची बाब म्हणजे म हापालिका अस्तित्वात आल्यास आयएएस दर्जाचे अधिकारी मिळतील, विकास कामांना गती मिळेल, जनतेवर टॅक्सचा बोजा पडणार नाही अशी आश्वासन त्यावेळी आपल्या विरोधकांनी दिली होती. आज काय परिस्थिती आहे जालना महानगर पालिकेची शहरातील जनतेला कळून चुकली आहे. शहरातील विकास कामे ठप्प झाली असून राज्य शासनाकडूनही विकास कामांना अपेक्षित निधी मिळत नसल्याने आ.अर्जुन खोतकर यांच्यामुळे शहरातील व्यापारी व मालमत्ता धारकांना टार्गेट पान २ वर

मनपाच्या थकीत मालमत्ताधारकांवरील कारवाई नंतर व्यापाऱ्यांची आमदार खोतकरांकडे धाव

## काँग्रेसच्या काळात करवाढ झाली; मनपा आयुक्तांशी चर्चा करु - आ. खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगर पालिकेने थकीत मालमत्ताधारकांवर कारवाई करत मालमत्ता जप्त करण्याची मोहिम हाती घेतली आहे. यात सतीश पंच यांची मालमत्ता सील करुन जप्त केल्यानंतर तातडीने व्यापाऱ्यांनी आम दार अर्जुनराव खोतकर यांच्याकडे धाव घेतली. आ. खोतकर यांच्या निवासस्थानी व्यापाऱ्यांनी गुरुवार (दि ९) रोजी त्यांची भेट घेतली. प्रसंगी आ. खोतकर यांनी काँग्रेसच्या काळात करवाढ झाली होती. आपण मनपा आयुक्तांशी चर्चा करुन तोडगा काढू असे आश्वासन यावेळी आ. खोतकर यांनी व्यापाऱ्यांना दिले.

मनपाच्या कारवाई नंतर व्यापाऱ्यांनी खोतकर यांची भेट घेतली. यावेळी व्यापाऱ्यांनी आपल्या व्यथा आ. खोतकर यांच्यासमोर मांडल्या. कर वाढल्याने थकीत रक्कम मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. यावर आ. खोतकर यांनी काँग्रेसच्या कार्यकाळात कर वाढ झाली. संगीता गोरंट्याल ह्या नगराध्यक्ष असतांना कर वाढविला होता. या कर वाढीच्या विरोधात शिवसेना रस्त्यावर उतरली



होती. त्या वेळी व्यापाऱ्यांनी साथ देणे गरजेचे होते. त्या वेळी व्यापारी विरोधासाठी का आले नाही असा प्रश्नही आ. खोतकर यांनी यावेळी उपस्थित केला. शहर मनपा आयुक्तांशी आपण याबाबत चर्चा करु व तोडगा काढू असे आश्वासन यावेळी आ. खोतकर यांनी व्यापाऱ्यांना दिले.

यावेळी यावेळी शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले, व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष सतीश पंच, हस्तीमल बंब, ओमप्रकाश मंत्री, शांतिलाल चोरड़िया, पुरुषोत्तम अग्रवाल, अनिल सोनी, दीपक भूरेवाल, सुनील रूणवाल, अनिल पंच, हुकुमचंद पाटनी, विष्णुकुमार चेचानी, संजय लव्हाडे, संजय मुथा, किशन भक्कड़, गेंदालाल झुंगे, वसीम कच्छी, अनिल लोढ़ा, सामाजिक कार्यकर्ते मयूर अग्रवाल, गणेश लुटे, रवी अग्रवाल यांच्यासह व्यापाऱ्यांची उपस्थिती होती.

## जनआक्रोश मोर्चाला उपस्थित रहा - देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** परभणीतील संविधानाच्या विटंबना प्रकरणी दगडफेक करण्यात आली होती ह्या दगडफेकीत आरोपीला ताब्यात घेतला असून पोलीस कोठडीत सोमनाथ सूर्यवंशी यांचा निधन झाले बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली याचे पडसाद महाराष्ट्रात उमटले आहे. शुक्रवार (दि १० जानेवारी) रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती संभाजी महाराज उद्यान पासून ते अंबड चौफुली पर्यंत जन आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चानंतर संतोष देशमुख यांच्या हत्याकांड प्रकरणी आरोपीला फाशी शिक्षा न दिल्यास आंदोलन सुरू ठेवून असा इशाराही मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी यांनी दिला उद्याच्या होणाऱ्या जन आक्रोश मोर्चा साठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख मराठा महासंघाचे कोषाध्यक्ष अशोक पडूळ संदीप ताडगे विशंभर तिरुखे देवकर्ण वाघ गणेश शिंदे यांनी केले आहे मंठाकडुन येणाऱ्या समाज बांधवांसाठी क्रीडा संकुल येथे पार्किंगची व्यवस्था करण्यात आली घनसांवगी कडून येणाऱ्या समाजासाठी गोल्डी लॉन्स येथे पार्किंगचे व्यवस्था करण्यात आली बदनापूर कडून येणाऱ्या समाजासाठी भोकरदन नाका येथे पार्किंगचे व्यवस्था करण्यात आली जालन्यातून येणाऱ्या समाजासाठी आजाद मैदान येथे पार्किंगची अवस्था करण्यात आली यापूर्वी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली तशीच पार्किंगची अवस्था करण्यात आली असल्याची माहिती मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी दिली आहे.

युवा आदर्श

### शेळपट ...

मनात सारे तुंबलेले
कायम कशी वटवट
संभाषणात एकसुरी
भुणभुण नि कटकट
संतापाने लाले लाल
कपाळा का मळवट
दृष्टी दोष जडला का
चष्मा किती धुळवट
घातले पूर्ण मधस्नान
जीभ भलती कडवट
स्पीड ब्रेकर्स मोठाली
राहतात सदा अडवट
सिंहासनावर बसता
रे वागणे बनले उर्मट
पुरोगामी म्हणे स्वता
वृत्ती विचीत्र रे कर्मठ
हेकेखोर आढ्यत्खोर
विचार विखार तर्कट
विध्वंसमातला मनात
मदिरा प्राशिले मर्कट
दुजां दुखवणे आवडे
अतीव आचरट वात्रट
डोक्यां सतत दहशत
स्वभाव घाबरट भित्रट
आव आणे बाहुबली
रक्तात भरला शेळपट
पातकांच्या गदारोळा
रक्तही बनले काळपट

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## मकरसंक्रांती निमित्त मोफत गुडघे विकार आणि हाडांची ठिसूळता तपासणी शिबिर

**जालना । प्रतिनिधी-** लॉयन्स क्लब ऑफ जालना आणि विवेकानंद हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मकरसंक्रांती सणाचे औचित्य साधून महिला आणि पुरूषांसाठी बुधवारी (ता .१५) सकाळी १0 ते १ या वेळेत मोफत गुडघे विकार आणि हाडांची ठिसूळता तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

विवेकानंद हॉस्पिटल येथे होणाऱ्या शिबिरात आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त गुडघे विकार आणि हाडांचे निष्णात तज्ञ डॉ. सिद्धांत गोयल हे तपासणी करून रुग्णांना मार्गदर्शन करणार आहेत. गुडघ्यांचे आजार, हाडांची ठिसूळता, गुडघेदुखी, संधिवात, गुडघ्यांच्या सांध्यांची घसरण, गुडघ्यांचा वाकडेपणा, कॅल्शियम आदी तपासण्या करण्यात येतील. सोबतच अन्य तपासण्यांवर विशेष सवलत मिळणार आहे. सदर शिबिर हे म हात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत घेण्यात येत असून, एम .क्युअर फार्मा कंपनीच्या सहकार्याने मशीन उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती प्रशासकीय अधिकारी शशिराज केंढे आणि व्यवस्थापक किशोर आघाम यांनी दिली.

जालना शहर आणि जिल्ह्यातील रुग्णांनी या शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन लॉयन्स क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्ढा, सचिव मंजू श्रीमाळी, कोषाध्यक्ष कल्पना बियाणी, प्रकल्प प्रमुख कमलाकर मोरे व जगदीश भुतडा, विवेकानंदचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. आर. डी .सचदेव, संचालक डॉ. श्रीमंत मिसाळ, डॉ. चारुदत्त हवालदार, डॉ. चारुस्मिता हवालदार, डॉ. सतीश गोयल, डॉ. अनिल कायंदे, डॉ.माधुरी पाकणीकर, डॉ. पूजा कायंदे आदींनी केले आहे.

## महाचिंतनीने सर्वज्ञ चक्रधर स्वामींचा विचार रूजवला - आचार्य हरिभाऊ वेरूळकर

महाचिंतनीला सुरूवातय संजीवनी कॅम्पस्मध्ये हजारो भाविक सहभागी

**जालना । प्रतिनिधी -** दुसऱ्याचं चांगल स्विकारण्याची मानसिकता नाही. म हानुभाव आणि वारकरी पंथाचे विचार माणसाला माणूस बनविण्यासाठी असून म. बाभुळगावकर शास्त्री यांनी महाचिंतनी तून दुसऱ्याला आपलस करण ही महानता, चक्रधरस्वामींनी दिलेला सर्वज्ञाचा दृष्टीकोन रूजवला असे प्रतिपादन मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रमाचे प्रम ुख आचार्य हरिभाऊ वेरूळकर यांनी केले. जालना शहरातील राजपूत वाडी परिसरात ज्ञान संजीवनी कॅम्पस मध्ये तीन दिवसीय महाचिंतनी ला गुरूवारी ( ता. ०९) कडूभाऊ काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण, श्रीकृष्ण मुर्तीस मंगल स्नान व गीतापाठाने उत्साहात सुरूवात झाली. उद्घघाटन प्रसंगी वेरूळकर बोलत होते. खा. डॉ. कल्याण काळे, स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर,आचार्य शेवलीकर, कोठी बाबा,ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर, आ. बबनराव लोणीकर, माजी आ. अरविंदराव चव्हाण, कृषीरत्न विजय आण्णा बोराडे, विनीत साहनी, पंडितराव भुतेकर, बाबुराव सतकर, पान २ वर

### दोन्ही पंथात तत्वांचे साम्य - आ. खोतकर

स्वागताध्यक्ष माजी मंत्री आमदार अर्जुनराव खोतकर यांनी महाचिंतनी हा माणुसकीचा धर्म शिकवणारा कार्यक्रम आहे. नुसते विचारच नव्हे तर आचारधर्म सांगणारा चिंतनी परिवार आहे माझे कुटुंब वारकरी संप्रदायाचे पाईक असले तरी महानुभाव व वारकरी संप्रदायाचे तत्व खूप साम्य आहे असे आ. खोतकर यांनी सांगितले.




## बागेश्वरी दुर्घटनाः राहुल लोणीकरांच्या हस्ते पीडित कुटुंबियांना मदतीचा चेक प्रदान

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यासह जिल्ह्याला हादरून टाकणाऱ्या श्रध्दा एनर्जी अँड इन्फ्राप्रोजेक्ट च्या बागेश्वरी साखर कारखान्यातील गंधक च्या टाकीचा स्फोट होऊन यामध्ये दोन कामगारांचा मृत्यू झाला होता.

या कामगारांना म दत मिळावी म्हणून राहुल लोणीकर यांनी पुढाकार घेत मयत कुटुंबांना घटना घडल्यानंतर सांत्वन भेटीच्या वेळी कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव जाधव यांना बोलून प्रत्येकी दहा लाख रुपये आर्थिक मदत म्हणून द्यावी अशी मागणी स्वतः राहुल लोणीकर यांनी केली होती यावेळी शिवाजीराव जाधव यांनी राहुल लोणीकर यांचा शब्द पाळला आणि मदत जाहीर केली घटनेच्या काही दिवसानंतरच राहुल लोणीकर यांच्या हस्ते दिनांक ५ जानेवारी रोजी आबासाहेब कांबळे कारखान्याचे जनरल मॅनेजर ऊस पुरवठा अधिकारी तसेच शिरसगाव चे उपसरपंच प्रभाकर जाधव पांडुरंग खरात



शंकरराव पारखे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता पीडित कुटुंबांना मदतीचा धनादेश वितरित करण्यात आला यावेळी शत्रुघ्न कणसे रवी सोळंके नरेश इंद्रराव जाधव तुकाराम माटे सुनील खरात सखाराम कंकाळ स्वप्नील रोडगे संतोष शेजुळ यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. यावेळी पान २ वर

### जनआक्रोश मोर्चानिमित्त वाहतूक मार्गात बदल

**जालना । प्रतिनिधी -** मराठा क्रांती मोर्चा आणि समविचारी संघटना वतीने शुक्रवार दिनांक १0 जानेवारी २०२५ रोजी ११.00 वाजता संभाजी महाराज पुतळा मोतीबाग जालना ते जिल्हाधिकारी कार्यालय जालना व अंबड चौफुली येथील हॉटेल शिवनेरी पर्यंत न्याय महाजन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे, सदर ठिकाणी पोहचल्यानंतर मोर्चेचे रुपांतर सभेमध्ये होणार आहे. सदर मोर्चा व सभेच्या वेळी मोर्चास अडथळा निम र्ाण होवू नये. रस्ता मोकळा राहावा व रस्त्यावर वाहने उभी राहुन मार्गात अडथळा निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये, या दृष्टीने वाहतुकीचे नियमनासाठी या मार्गावरील वाहतुकीस पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१ चे कलम ३६ अन्वये पोलीस अधिक्षक अजय कुमार बंसल खालील प्रमाणे जालना शहरातील वाहतुक पान २ वर

शनिवारी पत्रकार दिनाचे आयोजन

### आमंत्रित पत्रकारांनी उपस्थित राहण्याचे बागडी यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** व्हॉईस ऑफ मिडीयाचे प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांनी शनिवार दि.११ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १0.३0 वाजता येथील हॉटेल मधुबनच्या हॉलमध्ये पत्रकार दिनाचे आयोजन केले आहे.



यावेळी दिवंगत पत्रकार शशिकांत पटवारी, सुरेंद्र जैस्वाल, रमेश बागडी, उदय पटवारी, शेख अलिम, मनोहर बुजाडे, लक्ष्मण पायगव्हाणे, अबुल हसन, रमण गायकवाड, दिगंबर शिंदे, गणेश जळगांवकर, रम ेश पाटील, श्रीकृष्ण भारुका, राजेंद्र तिरुखे, रतनलाल कुरिल, सतीश सुदामे यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात येणार आहे. यावेळी आमंत्रीत पत्रकारांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन आमंत्रण समितीचे सुयोग खर्डेकर, रविकांत दानम, कैलास फ ुलारी, मुकेश परमार, संतोष भुतेकर, गोपाल गोमंतीवाले, देवचंद सावरे, युवराज कुरिल, गौतम वाघमारे, सचिन सर्वे, विजय वैष्णव, शिवाजी बावणे व व्हॉईस ऑफ मिडीयाचे प्रदेश उपाध्यक्ष विकासकुमार बागडी यांनी केले आहे.

# संपादकीय पान

## गोड गळ्याचे गायक

हिंदी चित्रपट सृष्टीतील ख्यातनाम गायक आणि संगीतकार येसुदास यांचा आज ८५ वाढदिवस. हिंदी चित्रपट सृष्टीत ज्या गायकांनी आपल्या मधुर आवाजाने ठसा उमटवला त्यात येसुदास हे एक महत्वाचे नाव. १० जानेवारी १९४० रोजी एका मल्याळम ख्रिश्चन कुटुंबात जन्मलेल्या येसुदास यांचे वडील मल्याळम भाषेतील शास्त्रीय संगीतकार होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी संगीतकलेचे प्राथमिक धडे गिरवले. वयाच्या सातव्या वर्षी कोची येथील स्थानिक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी सुवर्णपदक जिंकले. कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तामिळ या दक्षिण भारतातील सर्व भाषेत त्यांनी गाणी गायली तिथे त्यांनी गायलेली सर्वच गाणी हिट झाली. त्यांच्या आवाजाची परदेशातील रसिकांना देखील भुरळ पडली. १९६५ साली रशियन सरकारने त्यांना गाण्यासाठी खास आमंत्रण दिले होते. गोड, मखमली आवाज ही येसुदास यांची ओळख बनली. त्यांच्या गोड आणि मखमली आवाजाची कीर्ती हिंदी चित्रपट सृष्टी पर्यंत पोहचली नसती तरच नवल. संगीतकार सलील चौधरी यांनी त्यांना दिग्दर्शक बासू चॅटर्जी यांच्या छोटीशी बात या चित्रपटात साठी एक गाणे गायला लावले. त्यांच्या आवाजाने बासू चॅटर्जी हे ही प्रभावित झाले त्यांनी त्यांना त्यांच्यव चित्रपटात गाण्याची ऑफर दिली. १९७० सालापासून त्यांनी हिंदी गाणी गायला सुरवात केली. जानेमन जानेमन तेरे दो नयन.... या गाण्यानंतर शांत सज्जन दिसणारा अमोल पालेकर यांच्यासाठी येसुदास यांचाच आवाज सूट होतो असा असे गणित बॉलिवूडने बांधले. येसुदास यांच्या मधुर आवाजामुळे अनेक संगीतकार त्यांना त्यांच्यासाठी गाण्याची गळ घालू लागले मात्र येसुदास हे गाण्याची निवड मात्र विचारपूर्वक करत. येसुदास यांनी फक्त अमोल पालेकर यांच्यासाठीच नाही तर अमिताभ बच्चन आणि जितेंद्र यांच्यासाठीही गाणी गायली. त्यांनी रवींद्र जैन, बप्पी लाहिरी, खय्याम, राजकमल, सलील चौधरी या संगीतकारांसमवेत अनेक सदाबहार हिंदी चित्रपटातील गाणी गायली. त्यांनी जवळपास ४५००० गाणी गायली आहेत. सध्याच्या पद्धतीची गाणी त्यांना आवडत नाहीत म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षांपासून गाणे गायचे थांबवले आहे. येसुदास यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. भारत सरकारने त्यांना २००२ सालीं पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार दिला आहे तर केरळ सरकारने त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील सर्वोत्तम स्वाती पुरस्कारम या पुरस्काराने गौरविले आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले आहेत. येसुदास यांनी काही दाक्षिणात्य भाषेतील चित्रपटांची निर्मितीही केली आहे. येसुदास यांनी गायलेली गोरी तेरा गाव बडा प्यारा, सुरमई अखियों मे, दिल के तुकडे तुकडे करके, जानेमन जानेमन तेरे दो नयन, चांद जैसे मुखडे पे ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. येसुदास यांचे चाहते केवळ भारतातच आहेत असे नव्हे जगभर त्यांचे चाहते आहेत. गोड आणि मखमली आवाजाचे गायक येसुदास यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# वाढते चेंगराचेंगरीचे प्रकार अत्यंत चिंताजनक

आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध तिरूपती बालाजी मंदिराजवळ वैकुंठ व्दार दर्शनाच्या टोकन वितरण केंद्रावर झालेल्या चेंगराचेंगरीत बुधवार दिनांक ८ जानेवारी २०२५ ला ६ जणांचा मृत्यू झाला तर ४० हुन अधिक गंभीर जखमी झाले. ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.टोकन वितरण केंद्र सकाळी ५ वाजता उघडण्याचे नियोजन होते.यासाठी भाविक रांगा लावू लागले व प्रचंड गर्दी झाली होती.विविध केंद्रावर सुमारे ४००० हजारहून अधिक भाविक रांगेत उभे असल्याचे सांगितले जाते व चेंगराचेंगरीमुळे मोठा गोंधळ उडाला आणि त्यात एका महिलेचा प्रथम मृत्यू झाला व नंतर गंभीर जखमी झालेल्या ५ भाविकांचा मृत्यू झाला अशाप्रकारे ६ भाविकांना चेंगराचेंगरीत आपले प्राण गमवावे लागले.देशात दरवर्षी अनेक ठिकाणी मंदिर परिसर, प्रवचन परिसर, किर्तन परिसर, गर्दीचे ठिकाण,रेल्वे स्टेशन किंवा अन्य ठिकाणी चेंगराचेंगरीचे प्रकार होतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी सुध्दा झालेली आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला आंध्रप्रदेशातील तिरूपती बालाजी मंदिराजवळ दिसून आले. चेंगराचेंगरीचे प्रकार का होतात याला मुख्य जबाबदार कोण याचाही विचार आपण सर्वसामान्यांनी, मंदिर प्रशासनाने व स्थानिक प्रशासनाने केला पाहिजे.कारण भाविकांनी भीड करायची व मंदिर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करायचे त्याचे प्रयचित्य भाविकांनी भोगायचे अशी परिस्थिती आज चेंगराचेंगरीच्या प्रकारात दिसून येते म्हणजेच आ बैल मुझे मुझे मार अशी परिस्थिती झालेली आहे.भारतातील चेंगराचेंगरीच्या अनेक भयावह घटना झालेल्या आहेत यामध्ये ५ मार्च २०१० ला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला.भारतात बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे असुरक्षितता असते. अनेकदा दुर्गम ग्रामीण भागात, डोंगराळ प्रदेशात, टेकड्यांवर किंवा योग्य मार्ग नसलेल्या नदीकाठावर धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले जाते. अशा ठिकाणी असलेला तीव्र उतार, स्थळाची असमान भूरचना,अरुंद मार्ग, एकाच ठिकाणी भाविक एकत्रित येणे या कारणांमुळे धार्मिक कार्यक्रमामध्ये मोठे धोके निर्माण होतात. त्यातून चेंगराचेंगरीच्या घटना घडतात.धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम घेताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करते व दुर्घटना उद्भवतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शननं (आयजेडीआरआर)ने प्रकाशित केलेल्या २०१३ च्या अभ्यासात असं दिसून आलं की, भारतातील ७९ टक्के चेंगराचेंगरीचे ठिकाणे हे धार्मिक मेळावे आणि तीर्थयात्रेची ठिकाणे आहेत. विकसित देशांमध्ये बहुतेक चेंगराचेंगरी स्टेडियम, संगीत मैफिली आणि नाईट क्लबच्या ठिकाणी होतात. परंतु भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये गर्दीच्या आणि चेंगराचेंगरीच्या बहुतेक दुर्घटना धार्मिक स्थळांवर होतात, असे केरळ सरकारच्या भू आणि आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक फैसल टी. इलियास यांनी सांगितले. ४ जुलै २०२४ उत्तर प्रदेशातील हाथरस येथे एका धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरी होऊन किमान २७ जणांचा मृत्यू झाला,१७ फेब्रुवारी २०२४ उत्तर प्रदेशातील मथुरा येथील पूजनीय श्रीजी मंदिरात होळीपूर्वी झालेल्या कार्यक्रमादरम्यान चेंगराचेंगरीत किमान सहा भाविक बेशुद्ध पडले तर काही जण जखमी झाले,२४ डिसेंबर २०२३ मथुरा येथील बांके बिहारी मंदिरात गर्दीमुळे गुदमरून दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला,१ जानेवारी २०२२ जम्मू आणि काश्मीरमधील प्रसिद्ध माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले,२१ एप्रिल २०१९ तामिळनाडूच्या त्रिची येथील मंदिर उत्सवात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला,१० ऑगस्ट २०१५ झारखंडमधील देवघर शहरातील एका मंदिरात चेंगराचेंगरीत किमान ११ जणांचा मृत्यू आणि ५० जण जखमी झाले,१४ सप्टेंबर २०१४ आंध्र प्रदेशातील राजमुंद्री येथे 'पुष्करम' उत्सवाच्या उद्घाटनाच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी जमली होती गोदावरी नदीच्या काठावरील एका प्रमुख स्नानस्थळावर चेंगराचेंगरीत २७ यात्रेकरूंचा मृत्यू आणि २० जण जखमी झाले,२५ ऑगस्ट २०२४ ला मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यातील एका मंदिरात अफवेमुळे चेंगराचेंगरी झाल्यानं दहा यात्रेकरू ठार आणि २० हून अधिक जखमी झाले,१३ऑक्टोबर २०१३ मध्यप्रदेशातील दातिया येथील रतनगढ मंदिराजवळ चेंगराचेंगरीत ८९ जणांचा मृत्यू आणि १०० हून अधिक जखमी झाले,१४जानेवारी २०११ केरळमधील सबरीमाला मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत १०६ यात्रेकरू ठार तर १०० हून अधिक जखमी झाले,४ मार्च २०१० उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला, ३०सप्टेंबर २००८ राजस्थानमधील जोधपूरमधील मेहरानगड किल्ल्याच्या परिसरात असलेल्या चामुंडा देवी मंदिरात चेंगराचेंगरीत २४४ लोकांचा गुदमरून मृत्यू झाला,३ ऑगस्ट २००६ हिमाचल प्रदेशातील नैना देवी मंदिरात चेंगराचेंगरीत सुमारे १५० भाविकांचा मृत्यू आणि ४०० हून अधिक जखमी झाले,२६ जानेवारी २००५ ला पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाई जवळील मंदेर देवी मंदिरात वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किटमुळे ठिणग्या निघाल्यानं घाबरलेल्या हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मंदिराकडे जाणाऱ्या अरुंद मार्गावर गर्दी झाल्यानं चेंगराचेंगरी झाली लोक एकमेकांवर पडल्याने २९१ जणांचा मृत्यू झाला तर २०० हून अधिक जण जखमी झाले,२७ ऑगस्ट २००३ नाशिक कुंभातील पवित्र स्नानादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ३९ जणांचा मृत्यू झाला तर १४०जण जखमी झाले.चेंगराचेगरीच्या भयावह घटना पहाता त्या टाळण्यासाठी मंदिर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी किंवा भाविकांनी गर्दीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याठिकाणी आपण जावे की नाही याचा गंभीरतेने विचार करूनच गेले पाहिजे.



मंदिर परिसरातील वाढत्या चेंगराचेंगरीच्या घटना पहाता मंदिर प्रशासनावर राज्य सरकारने व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व त्यांच्या चुका उघड करून कारवाई करून त्यात सुधारणा करण्याची आज गरज आहे.यामुळे दुर्घटना टाळण्यास मदत होईल व जीवितहानी टाळता येईल.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# स्पर्धा परीक्षा विशेष मार्गदर्शन ८४ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजी नगर । प्रतिनिधी -** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने ५ जानेवारी २०२५ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या जनसंपर्क कार्यालयात ८४ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला उद्घाटनपर मार्गदर्शन करताना अर्थशास्त्रीय संशोधक शिवम गायकवाड म्हणाले की, केंद्रीय लोकसेवा आयोग व राज्य लोकसेवा आयोगामार्फत प्रशासकीय पदे भरण्यासाठी प्रक्रिया राबविली जाते. पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखती द्वारे सक्षम उमेदवाराची निवड केली जाते. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत ३६ वेगवेगळ्या प्रकारच्या पदासाठी परीक्षा घेतली जात असते. आयएएस म्हणजे भारतीय प्रशासकीय सेवा हे त्यातील सर्वोच्च पद आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतली जाणारी युपीएससीची परीक्षा ही जगातील तिसऱ्या तर भारतातील पहिल्या क्रमांकाची सर्वोच्च कठीण परीक्षा आहे. या परीक्षेत निवड होण्यासाठी विविध विषयाचे ज्ञान असणे आवश्यक आहे कारण या पदावरील व्यक्तींचा सर्व क्षेत्रातील व्यक्तींशी संबंध येत असतो. पूर्व आणि मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मुलाखतीत पास होण्यासाठी जास्तीत जास्त सराव असण्याची गरज आहे. त्यातून मुलाखत देणाऱ्या उमेदवाराचा धर्मनिरपेक्ष स्वभाव तपासला जातो. यात निवड झालेल्यांना डेहराडून येथील लबासना तर्फे प्रशिक्षण दिले जाते.

याप्रसंगी गोविंद कांबळे म्हणाले की, स्पर्धा परीक्षेतून अनेक उच्च पदस्थ अधिकारी निर्माण झालेत पण ते फार काही समाजाच्या उपयोगात आले नाहीत. समाजात संकुचित विचार सर्वोच्च स्थानी आहे, ही शोकांतिकाच होय. टी. एन. थोरात म्हणाले की, आंबेडकरवादी मिशनचे कार्य पुढे घेऊन जाण्यासाठी संचालक बी. बी. मेश्राम यांच्या सारखे सर्वांनी कार्य केले पाहिजे. धनराज गोंडाणे म्हणाले की, ज्या समाजात राहतो त्या समाजाचा उद्धार करणे हे आपले कर्तव्य आहे. करिता सामाजिक बांधिलकीच्या भावनेने गरीब विद्यार्थ्यांना सहकार्य केले पाहिजे. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, शिक्षणाशिवाय मा-याच्या जागा काबीज करता येणार नाहीत म्हणून भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते तर तलवारीचे तयाच्या न्यारेच टोक असते, याचा गर्भित अर्थ लक्षात घेऊन पुढे गेले पाहिजे. प्रा. एस. एन. गवई म्हणाले की, जे मोठे होतात ते समाजाकडे वळून पाहत नाही. सुभाष ठोकळ म्हणाले की, न्यायधीश, जिल्हाधिकारी, तहसिलदार यासारख्या जागा या लोक सेवकांच्या जागा आहेत. तर ख-या मा-याच्या जागा राष्ट्रपती, राज्यपाल, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, मंत्री, खासदार, आमदार यासारख्या आहेत. त्याकडे आपले दूर्लक्ष होत आहे. म्हणून आपल्या समाजात राजकीय जागृती होणे आवश्यक आहे.

प्रमुख वक्ते पीईएसआर कॉलेजचे प्राचार्य दिलीप वर्घट म्हणाले की, पुणे जिल्ह्यातील अनेक ठिकाणी त्या काळात महात्मा फुले यांनी शेकडो लग्न विधी सत्यशोधक पद्धतीने ब्राह्मणाशिवाय पार पाडले होते. त्यामुळे ब्राह्मणांची दक्षिणा बुडाली म्हणून नुकसान भरपाई साठी



त्यांनी न्यायालयात फिर्याद दाखल केली होती. ज्यात फुले हरले. त्यांनी वरिष्ठ न्यायालयात अपील केली. त्यातही न्यायधीश ब्राह्मण असल्याने 'जातीसाठी माती खावी' याप्रमाणे निकाल दिल्याने ब्राह्मणांचा विजय झाला. पुन्हा सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यात आले तिथे मात्र न्यायधीश ब्रिटिश होते ज्यांनी लग्न न लावणा-यांना, काम नाही तर दाम नाही. या तत्त्वावर फुल्यांच्या बाजूने न्याय दिला यावरून मा-याच्या जागी सक्षम व योग्य व्यक्ती असल्यास काय होते? याचे हे महत्वपूर्ण उदाहरण आहे. म्हणून आपण मा-याच्या जागा काबीज केल्या पाहिजेत. उच्च पदस्थ नौक-या मिळविण्यासाठी शिकवणी वर्ग लावण्याची नेहमीच गरज नसते.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रशासकीय सेवेतील सर्व प्रकारची पदे काबीज करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मात्र आता बदलत्या काळानुसार केवळ पब्लिक सेक्टरवर अवलंबून न राहता प्रायव्हेट सेक्टर मधील एम. डी., सेक्रेटरी, सीईओ, यासारखी पदे सुद्धा काबीज केली पाहिजेत. करिता केवळ युपीएससी, एमपीएससी सारख्या परीक्षा देत असताना आता जग ग्लोबल झाले असल्याने जागतिक पातळीवरील परीक्षा देऊन जागतिक स्तरावरील पदे काबीज केली पाहिजेत. भारतातील ८ टक्के जनतेला संघटित क्षेत्रात नौक-या उपलब्ध असून त्यातील जवळपास ३ टक्के लोकांना शासकीय व ५ टक्के लोकांना खाजगी क्षेत्रातील नौक-या मिळू शकतात. तर मग उर्वरित ९२ टक्के जनतेच्या उदरनिर्वाहाचे काय? हा प्रश्न अनुत्तरित राहतो. म्हणून व्यवस्थापनाने त्यांच्या उदरनिर्वाहासाठी योजना राबविल्या पाहिजेत. हे समाज व्यवस्थापक राज्यकर्त्यांचे आद्यकर्तव्य आहे. जेणेकरून समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होऊ शकेल.

३ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी १९८१ दरम्यान दिल्ली येथे संपन्न झालेल्या बामसेफच्या प्रशिक्षण शिबिरातील नोंदीप्रमाणे मायावती या युवा शिबिरार्थी होत्या. तेव्हा त्या एम. ए., बी. एड., एलएलबी होत्या. तेव्हा त्यांना जिल्हाधिका-या सारख्या प्रशासकीय सेवेतील मा-याची जागा काबीज करायची होती. परंतु प्रशिक्षण शिबिराचा परिणाम म्हणून राजकीय क्षेत्रात ख-या मा-याच्या जागा असल्याची जाणीव झाल्याने आपले क्षेत्र बदलून घेतले परिणामी पुढे सुश्री मायावती उत्तर प्रदेश सारख्या मोठ्या राज्याच्या त्या मुख्यमंत्री राहिल्या आहेत. हे प्रेरणादायी उदाहरण लक्षात घेऊन शिक्षण घेतल्यावर नौक-या शोधण्यापेक्षा ज्या क्षेत्रात जायचे आहे त्या प्रकारचे आवश्यक शिक्षण घेतले पाहिजे. म्हणजे नौक-यासह व्यवसायात किंवा इतरही क्षेत्रात स्थिरावता येईल. करिता प्राचार्य दिलीप वर्घट यांनी म्हटल्याप्रमाणे शिकवणी वर्ग लावण्याची नेहमीच आवश्यकता नसेल तर गरीब, असहाय, होतकरू विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराप्रमाणे १८-१८ तास अभ्यास केला पाहिजे. करिता फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल युपीएससी, एमपीएससीसह इतर सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षेची तयारी करणा-या प्रामाणिक विद्यार्थ्यांना सहकार्य करण्याची भूमिका पार पाडत आहे. तरी संबंधितांनी प्रत्यक्ष संपर्क करावे.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रतीक पंचशील व सुत्रसंचालन एड. विलास रामटेके यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, गोविंद कांबळे, इंजिनिअर किशोर पाटील, प्रतीक पंचशील, अशोक मेश्राम, धनराज गोंडाणे, जीवक मुजमुले, प्रा. एस. एन. गवई, सुभाष ठोकळ, प्रा. दिलीप वर्घट इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

# सिने पत्रकार बाबा लोंढे यांना राज्यस्तरीय दर्पनकार पुरस्कार



**नाशिक -** येथील अशोका व्हर्चुएल हॉल , इंजिनियर्स इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया , उंट रोड नाशिक येथे राज्यस्तरीय दर्पनकार पुरस्कार जो बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती दिनी मराठी पत्रकार दिन म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकारांच्या वतीने मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. त्याच्या पूर्वसंध्येला आखिल भारतीय सक्षम टाइम्स मीडीया फौंडेशन ने महाराष्ट्रातील विविध वर्तमान पत्र आणि ईलेक्ट्रॉनिक मीडिया मध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या पत्रकारांचा आकर्षक ट्रॉफी ,सन्मान पत्र , पुष्पगुच्छ आणि रुबाबदार फेटा देऊन गौरविण्यात आले.

या पुरस्कार सोहळ्यामध्ये मुंबईतील सिने पत्रकार श्री बाबा लोंढे यांचाहि पुरस्कार , सन्मानपत्र , फेटा व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

बाबा लोंढे हे एक हसमुख व बोलके व्यक्तिमत्व- जवळ जवळ ३० वर्ष फोटो जर्नालिस्ट म्हणून बॉलिवूड मध्ये कार्यरत . अनेक नायक नायिकांचे फोटोशूट , इंटरव्ह्यु , शूटिंग रिपोर्ट चित्रपट संबंधी बातम्या , बर्थडे पार्टी , म्युझिक ,ट्रेलर , पोस्टर लॉन्च व गॉसिप अशा अनेक प्रकारच्या बातम्या फोटो सहित अनेक वर्तमान पत्रात , साप्ताहिकात , मासिकात यामी प्रकाशित केल्या आहेत. सुरुवात प्रादेशिक वर्तमान पत्रातून करून मायापुरि , फिल्मसिटी ,फिल्म फेयार किंग्सस्टार , कुबेर टाइम्स , प्रजावानी , पुढारी ,संचार , सुराज्य , दैनिक भास्कर , जागरण , पंजाब केसरी , व्रत्तमानस , पुण्य नागरी , लोकमत , लोकसत्ता , महाराष्ट्र टाइम्स , मिड डे ,बॉम्बे टाइम्स , डी एन ए , एमएच ०९ यू ट्यूब चॅनेल , तरुणमित्र ,मुंबई संध्या ,सान्झ समाचार इंडियन रीडर ,महासत्ता अशा अनेक दैनिक , पाक्षिक व मासिकात काम केले आहे. हे करत असताना अनेक मान सन्मान व पुरस्कारही मिळाले आहेत. आखिल भारतीय सक्षम टाइम्स मीडिया फौंडेशन च्या वतीने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थापक अध्यक्ष श्री विलास पाटील , राष्ट्रीय महासचिव श्री सुनील मगर व राष्ट्रीय संघटक श्री सुनील निकम यांच्यासह श्रीमती आरमा बेगम , ज्योती रामोळे यांनी अथक परिश्रम घेतले

## पान १ वरुन

### मनपा टॅक्स ...

करत जालना महानगर पालिकेकडून कर वसुलीसाठी मालमत्ता जप्त करण्याच्या कारवाया केल्या जात असल्याचा आरोप माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी केला आहे. सध्या वसूल करण्यात येत असलेला टॅक्स हा अगोदर पेक्षा अधिक आहे. भविष्यातही चार पट टॅक्स वाढणार असून हा संपूर्ण दोष खोतकरांचा असल्याची टिकाही गोरंट्याल यांनी केली आहे.

### महाचिंतनीने सर्वज्ञ ...

सीता मोहिते , डॉ.बळीराम बागल यांची प्रमुख उपस्थिती होती. आचार्य हरिभाऊ वेरूळकर म्हणाले, शिक्षणाने माणूस सुशिक्षित होत असला तरी सुसंस्कारित असेलच असे नाही, शिक्षणाने माणसाची भौतिक प्रगती होते परंतु शिक्षणाला संस्काराची जोड देणे आवश्यक आहे. साधु-संतांनी माणसावरच नव्हे तर अगदी प्राण्यांवरील दया प्रेम केले आहे असे नमूद करत संप्रदाय हा एक विचार असतो कोणताही धर्म अथवा संप्रदाय हा मानवी मूल्ये आणि कल्याणाचा मार्ग सांगतो त्यामुळे आधी माणूस व्हा असे आवाहन त्यांनी केले. महानुभाव आणि वारकरी पंथांचे विचार मानवी कल्याणाचे असून श्रीकृष्ण हा दोन्ही संप्रदायाचे दैवत आहे असे हरिभाऊ नेरुळकर यांनी सांगितले.

मराठी संस्कृतीमधील मूल्य विचार या विषयावर व्याख्यानात ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांनी मराठी भाषेला समृद्ध करणारी परंपरा महानुभाव पंथाने निर्माण केली असून निकष पाळून शास्त्रीय पद्धतीने दस्ताऐवज, स्थानकोश, चरित्र लेखनाचा आदर्श ८०० वर्षांपूर्वी जगासमोर दिला होता. महाराष्ट्राची सात्विक भूमी ही चक्रधरांसोबतच संतांनी निर्माण केली असून आज जाती -जातींमध्ये निर्माण झालेल्या वादांवर संतांचे व्यापक विचार हेच मूल्य आहे असे ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांनी सांगितले.

खा. डॉ. कल्याण काळे यांनी माचिंतनिस आपण नियमितपणे येत असतो. चक्रधर स्वामींनी दिलेला सर्वव्यापी सर्वज्ञतेचा विचार मानवी मूल्यांची उजळणी , मानवतेचे चिंतन होते असे खा.काळे यांनी नमूद केले.

प्रास्ताविक प. पू. सुदाम शास्त्री यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुभाष बागल यांनी तर प्रा. दिलीप देव्हढे यांनी आभार मानले. यावेळी हजारो महिला व भाविकांची उपस्थिती होती.

### बागेश्वरी दुर्घटना ...

राहुल लोणीकर यांनी बोलताना सांगितले की घडलेली घटना ही दुर्दैवी आहे ही कोणत्याच मदतीने पूर्ण होणारी नाही परंतु करता माणूस घरातून गेल्यास राहिलेल्या कुटुंबांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर असतो यामुळे फोन नव्हे फुलाची पाकळी म्हणून सदरील मदत कारखान्याच्या माध्यमातून देण्यात येत आहे पुढे बोलताना राहुल लोणीकर यांनी सांगितले की मतदारसंघ म्हणजे माझा कुटुंब आहे या कुटुंबा वर येणारे संकट म्हणजे लोणीकर परिवारावर येणारे संकट आहे त्यामुळे लोणीकर परिवार हा मतदारसंघातील शोषित वंचित गोरगरीब दिन दुबळे यांच्यासाठी सदैव तत्पर राहणार आहे.

### जनआक्रोश मोर्चा ...

नमुद पर्यायी मार्गान कळविण्याचे आदेश पारीत केले आहेत.

शुक्रवार, दि. १० जानेवारी २०२५ रोजी सध्याचा प्रचलित मार्ग - छक्र-७५३ अंबड चौफुली जालना- मोतीबाग - छत्रपती संभाजीनगर जालना पर्यायी मार्ग- बीड, अंबड, मंठा कडुन येणारी वाहतुक व छत्रपती संभाजीनगर कडे जाणारी वाहतुक ही मंठा चौफुली- नाव्हा चौफुली देऊळगांव राजा चौफुली- कन्हैयानगर चौफुली भोकरदन चौफुली ग्रेडर टि पॉइंट मार्गे छ. संभाजीनगरकडे जाईल व येईल.

वरील आदेश दिनांक १० जानेवारी,२०२५ रोजी सकाळी ९.०० वाजेपासुन मराठा क्रांती मोर्चा व सभा संपेपर्यत अंमलात राहील.असे आदेश पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिले आहे.

# निराधार, मनोरुग्णांची आई योजना घरत यांना सन २०२४ साठीचा कै. सौ. कमलताई जामकर दर्पण पुरस्कार जाहीर

**परभणी । प्रतिनिधी -** येथील कै.सौ. कमलताई जामकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा दर्पण पुरस्कार मुंबई येथील स्मित फाउंडेशन च्या संस्थापिका योजना घरत निराधार,मनोरुग्णांची आई या समाजसेविकेला कै.सौ.कमलताई जामकर दर्पण पुरस्कार -२०२४ जाहीर करण्यात आला आहे.


महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री भारत भूषण रावसाहेब जामकर यांनी आपल्या शुभेच्छा कमलताई जामकर यांच्या नावे सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलेला दर्पण पुरस्कार देण्याचे ठरविले तेव्हापासून हाच तागायत ही परंपरा सुरू आहे. पुरस्काराचे हे २२ वे वर्ष असून.या पुर्वी साहित्यिक रेखा बैजल, डॉ. वृषाली किन्हाळकर, डॉ.मेबल आरोळे, अनाथांची माता सिंधुताई सपकाळ, राणी बंग, डॉ.हेमलता पाटील,ड.सुरेखा दळवी,कु. नसीमा म हुरजूक, सौ.वैशाली पाटील, सौ.प्रतिभा शिंदे, प्रा. साधना झाडबुके, डॉ. मंदाताई आमटे, श्रीमती मयाताई सोरटे, श्रीमती रेहमतबी करीम बेग मिर्झा, श्रीमती सुमनसिंह चौहान व श्रीमती मिठू देवी, सुलोचना कडू, श्रीमती अनुराधा कोईराला, डॉ.जोत्स्ना कुकडे. श्रीमती पिंजारीबाई उल्या पावरा, पद्मश्री राहीबाई सोमाजी पोपेरे, सौ. सुशीला विठ्ठलराव साबळे यांना प्रदान करण्यात आला.



२२ व्या पुरस्काराच्या मानकरी स्मित फाउंडेशन मुंबई च्या निराधार व मनोरुग्णांची आई योजना घरत यांचे निराधार वृध्द, मनोरुग्णं यांच्या साठीचे सेवाकार्य मोलाचं असं आहे. स्वतः मदर तेरेसा यांच्या अनाथ आश्रमात वाढलेल्या योजना ताई या निराधार व मनोरुग्णांसाठी कार्य करीत आहेत. महिला सक्षमीकरण, कुष्ठरोग्यांची सेवा, विशेष मूल व त्याची काळजी, निराधार साठी मागील २८ वर्षापासून सातत्यपूर्ण योजना ताईंचे कार्य सुरू आहे. सन २०१७ साली मुंबई येथे स्मित फाउंडेशन ची स्थापना केली. गरीब,अनाथ, मानसिकदृष्ट्या आजारी अशा लोकांची काळजी घेण्यात त्या समर्पित झाल्या. अशा गरजू लोकांसाठी निवासाची व्यवस्था व्हावी यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. समाजातील निराधार आई-वडील हीच आपली प्रेरणा असून त्यांच्या उन्नतीसाठी त्या कार्यरत आहेत. दुःखी कष्टी अनाथ अशा लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे साठी स्मित फाउंडेशन कार्यरत आहे. योजना ताईंचे शिस्तबद्ध कार्यातून देश-विदेशातील विद्यार्थ्यांसाठी स्मित फाउंडेशन विविध शिबिरांचे आयोजन करते आजच्या हायटेक पिढीने आईवडिलांकडे दुर्लक्ष केल्याने फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे.त्यांच्यामध्ये सुमध्य साधण्याचा प्रयत्न स्मित फाऊंडेशन करीत आहे. निराधारांच्या आरोग्याची आहाराची काळजी घेत आश्रमात निवास,अन्न, आरोग्य सेवा ,शिस्त, स्वच्छता, मनोरंजन,औषधोपचार सह आर्ट ऑफ लिविंग,झुंबा,योगा, भजन,कीर्तन,हिलींग यासारख्या मनोरंजनात्मक उपक्रमातून या सर्वां मधे निरोगी आणि सकारात्मक बदलासाठी प्रयत्न फाउंडेशन सक्रिय आहे. अनेक हॉस्पिटल आणि नर्सिंग कॉलेज या कामी सहकार्य देत आहेत.

स्मित फाउंडेशन मुंबई यांचे कार्य लक्षात घेत.योजना घरत यांना कै.सौ. कमलताई जामकर दर्पण पुरस्कार -२०२४ साठी पुरस्काराच्या मानकरी म्हणून सौ कमलताई जामकर दर्पण पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष हेमंत जामकर ,उपाध्यक्ष ड.बाळासाहेब जामकर, सचिव विजय जामकर, सहसचिव अनिल मोरे, यांनी निवड झाल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# सुरंगळी येथील कृषी सेवा केंद्राला माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची भेट



**सुरंगळी । प्रतिनिधी -** भोकरदन तालुक्यातील सुरंगळी येथे काल श्रीराम कृषी सेवा केंद्र केंद्राला सदिच्छा भेट देऊन कृषी सेवा केंद्राची पाहणी करीत माहिती घेत फळबागावरील औषध फवारणी तसेच शेतकऱ्यांना लागणाऱ्या कीटकनाशकांची , खतांची माहिती घेऊन श्री भगवान भोंडे यांच्या सोबत बऱ्याच वेळ देऊन चर्चा करण्यात आली यावेळी भगवान भोंडे यांचे वडील श्री भाऊराव भोंडे,श्री रामभाऊ वानखेडे, श्री राहुल संजय जाधव, ज्येष्ठ पत्रकार श्री सुभाष वरपे, रामेश्वर जाधव ,यांच्यासह मोठ्या संख्येने गावातील तरुण मित्र मंडळ यांच्यासोबत संवाद साधला आताच्या तरूण पिढीला शरीर हीच खरी संपत्ती आहे तरुण मित्र मंडळाची आडी अडचण जाणून घेण्यासाठी तरुण मित्र मंडळासाठी सात लाख रुपये किमतीची व्यायाम शाळा तयार करून आपल्या सेवेत देण्यात आली त्याचा पुरेपूर वापर करावा अशे ही आव्हान माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी संवाद साधताना केला आहे सध्या तरुण मित्र मंडळाने व्यायाम शाळेत व्यायाम करणे ही काळाची गरज आहे सर्व तरुणांनी व्यायाम करून आपले शरीर सुदृढ बनवावे शिक्षणाकडे लक्ष देणे स्पर्धा परीक्षेत सहभागी होणे ही तितकेच महत्त्वाचे आहे तसेच कृषी सेवा केंद्राचे संचालक श्री भगवान भाऊराव भोंडे यांनी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचा शाल श्रीफळ सत्कार करण्यात आला या या सदिच्छा भेटीदरम्यान माजी केंद्रीय मंत्री दानवे यांनी आनंद व्यक्त केला आहे

# शिवमती कल्याणी देशमुख यांचे शनिवारी व्याख्यात

**जालना । प्रतिनिधी -** मराठा सेवा संघ प्रणित राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव समितीच्या वतीने ११ जानेवारी २०२५ रोची सायंकाळी ७ वाजता अंबड रोडवरील मातोश्री लॉन्स येथे शिवमती कल्याणी देशमुख यांचे व्याख्यात आयोजजित करण्यात आल्याची माहिती समितीचे अध्यक्ष सर्जेराव बोराडे यांनी दिली आहे.

यावेळी शिवमती कल्याणी देशमुख ह्या माँ साहेब जिजाऊ एक प्रेरणास्त्रोत्र या विषयावर व्याख्यान देणार आहेत. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन समितीचे अध्यक्ष इंजि. सर्जेराव बोराडे, सचिव बबनराव गाडेकर, कार्याध्यक्ष किरण गरड, उपाध्यक्ष विनोद भांडवले, कोषाध्यक्ष प्रा.रमेश गजर, सहसचिव विजय ज-हाड, सहकोषाध्यक्ष दिपक काळे कार्यकारीणी सदस्य अ‍ॅड. धनशाश सोळुंके, विष्णु सोनुने ,लक्ष्मण बोंढारे प्रा. गजानन देशमुख, रविंद्र पाटील, रोहीत देशमुख, सिमाताई काकडे गंगाधरे, मंजुश्रीताई झोडगे, सुवर्णा राऊत, संदीप पाटील,सुधाकर पवार, प्रा.बद्रीनाथ घोंगे, ज्ञानेश्वर डुकरे, दौलतराव इंगळे, नंदकुमार कोलते, पंढरीनाथ शेळके, संदिप इंगळे, रघुनाथ खरात तसेच मार्गदर्शक आर. आर. खडके, संदीपान जाधव, संतोष गाजरे, सुनील आर्दड, विजय पांगारकर, विभावरी ताकट, विमलताई आगलावे, शितलताई तनपुरे, प्राचार्य चंद्रसेन कोठावळे, रोहित देशमुख, राजेंद्र गोरे सुभाष कोळकर, महेश नन्नावरे,आर. डी. पवार, काकासाहेब खरात, विजय वाडेकर कैलास खांडेभराड, दत्तात्रय कपाळे, ज्ञानेश्वर ताकट यांनी केले आहे.

विशेष म्हणजे १२ जानेवारी रोजी मातृतिर्थ सिंदखेडराजा येथे जाणार्या जिजाऊ भक्तांसाठी दि. ११ जानेवारी रोजी सायंकाळी जालना येथे सुनील आर्दड यांच्या मातोश्री लॉन्स, अंबड रोड, जालना, किशोर पांगारकर यांच्या मंजुळादेवी मंगल कार्यालय, अंबड रोड, जालना व मराठा सेवा संघ कार्यालयाच्या मा. खा. भाऊसाहेब देशमुख सभागृहात राहण्याची व भोजणाची सोय करण्यात आली आहे.

# वीर यशवंतराव घाडगे यांचा गौरवशाली इतिहास भावी पिढीपर्यंत पोहचवा - मंत्री आदिती तटकरे

## माणगाव येथे व्हिक्टोरीया क्रॉस विजेते वीर यशवंतराव घाडगे यांची जयंती उत्साहात साजरी

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** शहीद विर यशवंतराव घाडगे यांचा गौरवशाली इतिहास आजच्या भावी पिढीपर्यंत पोहचला पाहिजे, असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी येथे केले. माणगाव येथे शहीद वीर यशवंतराव घाडगे व्हिक्टोरीया क्रॉस मानचिन्ह धारक (मरणोत्तर) यांचा जयंती समारंभ कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी समारंभाच्या अध्यक्षस्थानी घाडगे उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माणगाव प्रांताधिकारी डॉ.संदीपान सानप, प्रमुख अतिथी म्हणून कर्नल किशोरकुमार मोरे होते. तर उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी,घाडगे उत्सव समितीचे सचिव तथा तहसिलदार दशरथ काळे,वीर यशवंतराव यांचे वारसदार सुभाष घाडगे,माणगाव नगरपंचायत मुख्याधिकारी संतोष माळी, माणगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी शुभदा पाटील,गटशिक्षणाधिकारी सुरेख तांबट, केंद्रप्रमुख शंकर शिंदे,माजी सैनिक संघटना माणगाव अध्यक्ष सहादेव खैरे,माजी अध्यक्ष विष्णू सावंत,पोलादपूर माजी सैनिक संघटना अध्यक्ष वाय. सी.जाधव,माणगाव नगरपंचायत महिला व बालकल्याण समिति सभापती सुविधा खैरे आदींसह आजी-माजी सैनिक,पोलीस अधिकारी-कर्मचारी, विविध शाळांचे शिक्षकवर्ग,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी व्हिक्टोरिया क्रॉस विजेते शहीद वीर यशवंतराव घाडगे यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण केले. त्या पुढे म्हणाल्या की, माजी सैनिक यांच्या विश्रामगृहासाठी आवश्यक असलेल्या निधीची उपलब्धतता करुन दिली जाईल. विश्रामगृहामध्ये वीर मरण आलेल्या सैनिकांची माहिती दिल्यास ती माहिती भावी पिढीला मार्गदर्शक ठरेल असे त्यांनी यावेळी सांगितले. वीर घाडगे यांच्या वीर शौर्याची गाथा वर्तमान पिढीतील लोकांपेक्षा भावी पिढीपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. यासाठी पुढील वर्षी होणार वीर यशवंतराव घाडगे यांच्या जयंती समारंभास माणगाव शहरातील सर्व शाळांचे विद्यार्थी तसेच तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांना बोलविल्यास ही शौर्याची गाथा भावी पिढीपर्यंत पोहचून हा समारंभ अधिक मोठ्या प्रमाणात आपल्याला साजरा करता येईल असेही त्या म्हणाल्या.

यावेळी पोलादपूर तालुका माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष कर्नल किशोर कुमार मोरे, वाय.सी.जाधव, माजी सैनिक संघटना माणगाव अध्यक्ष सहादेव खैरे यांनी आपल्या मार्गदर्शनात शहीद वीर यशवंतराव घाडगे यांच्या अतुलनीय शौर्याची माहिती दिली.

या समारंभाच्या प्रास्ताविकात घाडगे उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माणगाव प्रांताधिकारी डॉ.संदीपान सानप म्हणाले की, वीर यशवंतराव घाडगे यांची स्मृती कायम रहावी म्हणून रायगड जिल्ह्यातील माणगाव उपविभागीय कार्यालयाजवळ त्यांचा कायमचा पुतळा उभारण्यात आला आहे. वीर यशवंराव घाडगे यांनी केलेल्या अप्रतिम कामगिरीची स्मृती सतत जिवंत रहावी म्हणून माणगाव तहसिल कार्यालयामार्फत दरवर्षी ९जानेवारी रोजी त्यांचे कुटूंबिय, लोकप्रतिनीधी, प्रतिष्ठीत नागरीक व शाळा/कॉजेजमधील विद्यार्थी तसेच माणगाव, महाड, पोलादपूर, रोहा, म्हसळा, तळा या तालुक्यातील आजी माजी सैनिकांच्या उपस्थितीत मोठया प्रमाणात घाडगे उत्सव साजरा करण्यात येतो. या समारंभाला उपस्थित सर्वांचे आभार घाडगे उत्सव समितीचे सचिव तथा तहसीलदार माणगाव दशरथ काळे यांनी मानले.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी दि. ९ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. २२ जानेवारी २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# स्वराज्य शिक्षक संघाच्या मंठा-परतूर तालुकाध्यक्षपदी विजयजी राठोड यांची निवड

**मंठा । प्रतिनिधी -** स्वराज्य शिक्षक संघाच्या मंठा-परतूर तालुकाध्यक्ष पदी विजयजी राठोड ( विवेकानंद प्रा. शाळा परतूर)यांची निवड करण्यात आली. विजय राठोड अनेक वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात विना तथा अशतः अनुदानितांसाठी उल्लेखनीय कार्य करित आहेत. म्हणुन त्यांच्या कार्याची दखल घेऊन स्वराज्य शिक्षक संघाच्या शिक्षक पदाधिकारी मंडळाणे त्यांची मंठा-परतूर तालुकाध्यक्ष पदावर नियुक्ती केली आहे. या प्रसंगी स्वराज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री.ज्ञानेश चव्हाण, प्रदेशध्यक्ष ज्ञानेश्वर शेळके, महासचिव श्री शंकर शेरे, कार्याध्यक्ष दत्तात्रय चव्हाण, विजय सुराशे, गिरीश मखमले यांनी झूम मिटिंग वर झालेल्या ऑनलाइन बैठकीत नियुक्ती पत्र देऊन भविष्यात आपल्या हातून निरंतर शैक्षणिक तथा सामाजिक कार्य अविरत घडत राहो. पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# स्वामी विवेकानंद महाविद्यालयात तालुकास्तरीय स्पर्धेचे आयोजन



**मंठा । प्रतिनिधी -** नेहरू युवा केंद्र जालना युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालय भारत सरकार व स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय मंठा यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली. क्रीडा प्रकारात कबड्डी (मुले- मुली), खो-खो (मुली), गोळा फेक (मुले -मुली),१०० मी धावणे (मुल-मुली) हे खेळ आयोजित करण्यात आले होते.

क्रीडा स्पर्धा घेण्यासाठी श्री प्रकाश बुधवंत, नेहरू युवा केंद्र जालना जिल्हा समिती सदस्य श्री संदिप गायकवाड,प्रा.रमेश शिंदे, प्रा.डॉ.राजेश गायकवाड,प्रा. संतोष रंजवे,प्रा. एकनाथ आघाव,प्रा.संदेश राठोड,प्रा.रमेश मोरे, श्री भानुसे सर यांनी परिश्रम घेतले.

बक्षीस वितरण कार्यक्रमात प्राचार्य माणिकराव थिटे यांनी जीवनात खेळाचे किती महत्व आहे हे सांगितले. सोबत प्रा.रमेश शिंदे यांनी सांघिक तसेच वैयक्तिक स्पर्धेचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. माणिकराव थिटे, उपप्राचार्य. डॉ. सदाशिव कमळकर, उपप्राचार्य. डॉ. सुधाकर जाधव, उपप्राचार्य संभाजी तिडके प्रा. चारुलता पाटील मॅडम, प्रा. डॉ. राजेश गायकवाड, प्रा. रमेश शिंदे, प्रा. एकनाथ आघाव, प्रा. रमेश मोरे, प्रा. पंढरीनाथ काकडे, श्री राजेभाऊ कडूकर, श्री अशोक मुळे यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

# जालना समाजकार्य महाविद्यालयात प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** कर्मवीर प्रतिष्ठान संचालित जालना समाजकार्य महाविद्यालयात दिनांक ३ जानेवारी २०२५ ते ९ जानेवारी २०२५ दरम्यान सावित्रीबाई फुले जन्मोत्सवाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेचे प्रमाणपत्र वितरण दि. ९-०१-२०२५ रोजी महाविद्यालयात करण्यात आले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रशासकीय अधिकारी रमेश गजर, प्रा.डॉ.मीना बोर्डे हे उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमात सर्वप्रथम सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांना अभिवादन करण्यात आले यावेळी घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत तुकाराम नाटकर - प्रथम, बाळू काळे - द्वितीय, योगेश पवार,तृतीय, पांडुरंग भुतेकर - उत्तेजनार्थ,,वक्तृत्व स्पर्धेत - भास्कर साळवे - प्रथम, श्यामल मचे - द्वितीय, प्रकाश त्रिभुवन - तृतीय, योगेश पवार - उत्तेजनार्थ, पोस्टर स्पर्धेत - भास्कर साळवे - प्रथम, वैष्णवी भुतेकर - द्वितीय, प्रकाश त्रिभुवन - तृतीय, शुभांगी भुतेकर - उत्तेजनार्थ, रांगोळी स्पर्धेत - शुभांगी भुतेकर - प्रथम, श्यामल मचे -द्वितीय, कोमल मचे - तृतीय, वैष्णवी भुतेकर - उतेजनार्थ पारितोषिक पटकावले या या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा डॉ. रेणुका बडवणे, प्रा.डॉ.मधु खोब्रागडे, प्रा.डॉ.बालाजी मुंडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.दिपक बुक्तरे यांनी केले तर सूत्रसंचलन राजू वाघमारे यांनी केले तर आभार प्रकाश त्रिभुवन यांनी मानले.यावेळी सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी हिंदी विषयांचे मार्गदर्शन

**जालना -** महात्मा गांधी विद्यालयाच्या सभागृहात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेअंतर्गत हिंदी विषयाचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. व्याख्यानासाठी मार्गदर्शक म्हणून डोंबिवली येथील के. रा. कोतकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा. प्रशांत शिरुडे हे उपस्थित होते. हिंदी विषयाच्या व्याख्यानादरम्यान प्रशांत शिरूडे यांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील पाठ आणि कविता यांची वैशिष्ट्ये सांगत, हिंदी कृतीपत्रिकेतील पाचही विभागा नुसार गद्य, पद्य, पूरक पठण, व्याकरण, रचना विभागासहित कृतीपत्रिका आकर्षक व सुंदर कशी लिहावी याबद्दल मार्गदर्शन केले. शेवटी विद्यार्थ्यांच्या शंकांचेही त्यांनी निरसन केले.

# जालना शहरातील पाणीवेस ते दर्गावेस रस्त्याचं काम त्वरीत सुरु करा

## नागरिकांचे मनपा आयुक्तांना निवेदनः अन्यथा रास्ता रोको आंदोलन करणार

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील पाणीवेस ते दर्गावेस रस्त्याचं काम त्वरीत करा अशा मागणीचं निवेदन आज दिनांक नऊ गुरुवार रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास स्थानिक नागरिकांनी महापालिका आयुक्तांना दिलं आहे. शहरातील पाणीवेस ते दर्गावेस हा रस्ता मागच्या काही महिन्यांपासून खोदून ठेवलेला आहे. रस्त्याचं काम लवकर सुरु होईल असं आश्वासन नेत्यांनी दिलं होतं. मात्र, अद्याप पर्यंत हा रस्ता झालेला नाहीये. येथील घाणीचे साम्राज्य, रस्त्याची दुरअवस्था त्यामुळे उडणारी धुळ, ही आरोग्यासअतिशय घातक ठरत आहे. यामुळे बालकांनाव वयोवृध्दांना फुफ ुसाचे आजार दमा या सारखे गंभीर स्वरुपाच्या आजारांनी नागरिकांचे बळी पडत आहे.

त्यामुळं त्रस्त झालेल्या स्थानिकांनी आज थेट महानगरपालिका गाठत आयुक्तांना काम सुरु करण्याची विनंती केलीय. दरम्यान, रस्त्याचं काम लवकर सुरु केलं नाही तर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. देण्यात आले निवेदनात नमूद करण्यात आले की वरील परिसरातील कायमस्वरुपी रहिवासी आहोत या परिसरात अत्यंत दैनिय परिस्थिती निर्माण झालेली आहे सर्वप्रथम अतिक्रमणाचा विळखा, रस्त्याची झालेली दुरअवस्था, अंडर ग्राऊंड नाली नसल्याकारणामुळे सर्व घानीचे साम्राज्य आणि लाईट पोट हे रस्त्यांच्या मधोमद असल्याने होणार रोजचे अपघात हे रोज चे दैनदिन असलेले जीव घेणे संकट नागरिकांच्या आता जिवावर बेतल आहे.

या परिसरातून जाणारा हा मुख्य रस्ता एक मुख्य रस्ता आहे. त्यामुळे येथुन सतत रहदारी चालु असते मोठ मोठे अवजड वाहने येथुन वाहतुक करतात या सर्व कारणामुळे येथील घाणीचे साम्राज्य, रस्त्याची दुरअवस्था त्यामुळे उडणारी धुळ, ही आरोग्यासअतिशय घातक ठरत आहे. यामुळे बालकांनाव वयोवृध्दांना फुफ ुसाचे आजार दमा या सारखे गंभीर स्वरुपाच्या आजारांनी नागरिकांचे बळी पडत आहे. त्यांचबरोबर त्वचेचे रोग, या सर्व बाबी गंभीर स्वरुपात मा. आयुक्त साहेबांनी लक्षात घेवुन अतितात्काळ मार्ग काढून सर्व प्रथमअतिक्रमण, अंडरग्राऊड नाली, व उत्तम रस्ता आम्हा नागरिकांना करुन देण्यात यावे.

नसता वरील सर्व समस्या तात्काळ न सोडविल्यास कायदा व लोकशाही मार्गने तीव्र आंदोलन करण्यात येईल यामुळे जर काही बरेवाईट झाल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिका, प्रशासन यांच्यावर राहील यांची आपण गांभीयाने नोंद घ्यावी.

यावेळी बन्सीलाल ढवळे,सेवकलाल नारीयलवाले, दिपक बांगडे, अक्तरभाई कुरेशी, मनोज धानुरे, प्रकाश शिंदे, चंद्रकांत जाधव, सखाराम ढोपरे, सिताराम टकले, हमीदभाई शेख, शाम जाधव, राम सांळुके, रवि सोनटक्के, संतोष भवर, तुलजा ढवळे, राजेश ढवळे, महेश जाधव, राजु दोडके, गणेश ढोपरे, रुपेश वैष्णव, कन्हैयालाल नारीयलवाले, अक्षय नारीयलवाले यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.



# विज्ञान प्रदर्शनासाठी विवेकानंद सेवा केंद्राच्या चार शाळांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



**परतूर । प्रतिनिधी** - गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती परतुर अंतर्गत दि. ०७/०१/२०२५, जानेवारी रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विवेकानंद सेवा केंद्र संचलित, विवेकानंद इंग्लिश स्कूल (CBSE) चा विद्यार्थी काव्य किशोर पाटील ध्रुव रघुनंदन झंवर, विवेकानंद पब्लिक स्कूल (State Board) ची विद्यार्थिनी संचिता शिवाजी बोराडे, विवेकानंद प्राथमिक शाळेचा विद्यार्थी सोहम शशिकांत देशपांडे तसेच विवेकानंद माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी अदिती मोहन ढवळे या सर्वांची जिल्हास्तरीय स्पर्धे साठी निवड करण्यात आली आहे. तसेच विज्ञान शिक्षक बाळासाहेब मुंडे. निलेश सरदार.आकात मॅडम फाजगे.या सर्वांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष, आदरणीय डॉ. एस. जी. बाहेकर ,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, आदरणीय संदीप दादा बाहेकर. गटशिक्षणाधिकारी,संतोष साबळे. डॉ. स्मिता रोडगे मॅडम. अशोक राठोड. सर्व परीक्षक तसेच सर्व शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.